11 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जेची निर्मिती

## शिवाजी विद्यापीठातील संशोधनाला जर्मन पेटंट; बाईंडरविरहित पद्धती विकसित

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईंडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट मिळाले आहे.**


डॉ. सागर डेळेकर


डॉ. तुकाराम डोंगळे


डॉ. दीपक कुंभार


डॉ. प्रमोद कोयले


डॉ. सुनिल कदम


डॉ. क्रांतीवीर मोरे

विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायनशास्त्रज्ञ डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनील कदम, प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस. जी. एम. कॉलेज, कऱ्हाड), डॉ. दीपक कुंभार (ए. एस. सी. कॉलेज, इचलकरंजी) यांनी या संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला.

सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनवण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्त्वाची ठरते.

> 'सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला हे संशोधन गती देणारे ठरेल. तयार केलेली वेगवेगळी नॅनोसंमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते. तसेच ते सुलभतेने हाताळता येते. हे उपकरण तसेच ते तयार करण्याची पद्धत सौरऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल.
>
> **-डॉ. सागर डेळेकर**

विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमियम सल्फाईड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनोमूलद्रव्यांचा वापर केला आहे.


या नावीन्यपूर्ण संशोधनामुळे सौरऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल. या संशोधकांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025
तरुण भारत

# 'नॅनो' संशोधनाला जर्मन पेटंट

## नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्मितीची बाईंडरविरहित पद्धती





डॉ. सागर डेळेकर डॉ. क्रांतिवीर मोरे डॉ. तुकाराम डोंगळे डॉ. सुनिल कदम डॉ. प्रमोद कोयले डॉ. दीपक कुंभार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईंडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.

विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायन शास्त्रज्ञ डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाचे मेकॅनिकल विभाग प्रमुख डॉ. सुनिल कदम, डॉ. प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस. जी.एम. कॉलेज, कराड), डॉ. दीपक कुंभार (ए.एस.सी.कॉलेज, इचलकरंजी) यांचा या संशोधन प्रक्रियेत सहभाग आहे.

हे संशोधन सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला गती देणारे ठरेल, असा विश्वास डॉ. डेळेकर यांनी व्यक्त केला. तयार केलेली वेगवेगळी नॅनो संमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी

तरुण भारत
विद्यापीठातून

तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते. तसेच ते सुलभतेने हाताळता येते. हे उपकरण तसेच ते तयार करण्याची पद्धत सौरऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल.

सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनवण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्वाची ठरते. विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमियम सल्फाईड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनो मूलद्रव्यांचा वापर केला आहे. या नाविन्यपूर्ण संशोधनामुळे सौर ऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल. या संशोधनाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

11 FEB 2025 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा संशोधनास जर्मन पेटंट

■ **शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांचे यश**



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईंडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे. हे संशोधन सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला गती देणारे ठरेल, असा विश्वास डॉ. सागर डेळेकर यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायनशास्त्रज्ञ डॉ. डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनील कदम, डॉ. प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस. जी.एम. कॉलेज, कराड), डॉ. दीपक कुंभार (ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी) यांनी या संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला.

सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनवण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्त्वाची ठरते. विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमियम सल्फाईड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनो मूलद्रव्यांचा वापर केला आहे. या नावीन्यपूर्ण संशोधनामुळे सौरऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल.

या संशोधनाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी या संशोधकांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 20

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE

Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या अभिनव संशोधनास जर्मन पेटंट

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या संशोधकांनी नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी अभिनव बाईडरविरहित पद्धती विकसित केली आहे. या पद्धतीस जर्मन सरकारचे पेटंट प्राप्त झाले आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेसचे संचालक तथा रसायनशास्त्रज्ञ डॉ. सागर डेळेकर यांच्यासह डॉ. क्रांतिवीर मोरे, डॉ. तुकाराम डोंगळे, भारती विद्यापीठाच्या मेकॅनिकल विभागाचे प्रमुख डॉ. सुनिल कदम, डॉ. प्रमोद कोयले, डॉ. अनंत दोडामणी (एस.जी.एम. कॉलेज, कराड), डॉ. दीपक कुंभार (ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी) यांनी सदर संशोधन प्रक्रियेत सहभाग घेतला.

हे संशोधन सौरऊर्जा निर्मिती क्षेत्राला गती देणारे ठरेल, असा विश्वास डॉ. डेळेकर यांनी व्यक्त केला. तयार केलेली वेगवेगळी नॅनोसंमिश्रे आणि त्यापासून तयार करावयाचे उपकरण कमीत कमी तापमानात आणि अत्यल्प वेळेमध्ये बनवता येते, तसेच ते सुलभतेने हाताळता येते. हे उपकरण तसेच ते तयार करण्याची पद्धत सौरऊर्जा क्षेत्रात काम करणाऱ्या संशोधकांसाठी उपयुक्त ठरेल, असेही ते म्हणाले.

सौरऊर्जेचे उत्पादन त्या उपकरणामध्ये वापरल्या जाणाऱ्या अनेक घटकांवर अवलंबून असते. तसेच ते उपकरण बनवण्यासाठी वापरली जाणारी पद्धतही महत्त्वाची ठरते. विद्यापीठातील संशोधकांनी वेगवेगळ्या नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा निर्माण करणारी पद्धत कमीत कमी वेळेमध्ये आणि कमी खर्चामध्ये तयार केली आहे. यामध्ये कॅडमियम सल्फाइड क्वांटम डॉट, नैसर्गिक रंग, टायटॅनियम डायऑक्साईडच्या नॅनोमूलद्रव्यांचा वापर केला आहे. या नाविन्यपूर्ण संशोधनामुळे सौर ऊर्जा क्षेत्राला नवीन चालना मिळेल.

या संशोधनाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे सर यांनी सर्व संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 FEB 2025

तरुण भारत

# अंध विद्यार्थ्यांनी गिरविले विद्यापीठात बुद्धिबळाचे धडे

- बुध्दिबळ प्रशिक्षण कार्यशाळेचे कुलगुरूंच्या हस्ते उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा पॅव्हेलियनमध्ये दृष्टीदिव्यांग अर्थात अंध विद्यार्थ्यांना बुद्धिबळाच्या खेळाचे धडे देण्यात आले. विद्यापीठाकडून अंध शाळेसाठी बुद्धिबळाचे ब्रेलमधील १० संचही भेट देण्यात आले.




कोल्हापूर : बुद्धिबळ प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये अंध विद्यार्थ्यांमधील बुद्धिबळाचा डाव पाहताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी.

बुद्धिबळ हा बुद्धीचा कस पाहणारा खेळ मानला जातो. अंध व्यक्ती, विद्यार्थी यांनाही हा खेळ खेळता यावा, यासाठी ब्रेलमध्ये बुद्धिबळाचे पट उपलब्ध आहेत. मात्र, अंध विद्यार्थ्यांना ते खेळावे कसे, याची माहिती नसते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि इंग्रजी अधिविभाग यांनी संयुक्तपणे अंध विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ शिकविण्यासाठी विशेष शिबिर पार पडले. कोल्हापुरातील ज्ञान प्रबोधिनी अंध शाळेच्या विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. मनोहर वासवानी यांनी कार्यशाळा समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना बुद्धिबळाचे धडेही त्यांनीच दिले. विद्यापीठाकडून शाळेला बुद्धिबळाचे ब्रेलमधील दहा संच भेट देण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी उपस्थित होते.

11 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी गिरवले विद्यापीठात बुद्धिबळाचे धडे




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात आयोजित बुद्धिबळ प्रशिक्षण कार्यशाळेत दिव्यांग विद्यार्थ्यांमधील बुद्धिबळाचा डाव पाहताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, शरद बनसोडे, प्रभंजन माने, चंद्रकांत लंगरे, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर, ता. १० : शिवाजी विद्यापीठात दृष्टीदिव्यांग विद्यार्थ्यांना ब्रेल लिपीतील बुद्धिबळाच्या पटावर बुद्धिबळाचे धडे देण्यात आले. विद्यापीठाने दिव्यांग शाळेसाठी ब्रेल लिपीमधील दहा संचही अंधशाळेस भेट दिले.

बुद्धीचा कस लागणारा खेळ म्हणून बुद्धिबळाकडे पाहिले जाते. दिव्यांग (अंध) व्यक्ती, विद्यार्थ्यांनाही हा खेळ खेळता यावा, यासाठी ब्रेलमध्ये बुद्धिबळाचे पट उपलब्ध आहे. मात्र, दिव्यांग विद्यार्थ्यांना ते खेळावे कसे, याची माहिती नसते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभाग व इंग्रजी अधिविभाग यांच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ शिकवण्यासाठी विशेष शिबिर आयोजित केले होते. यात ज्ञान प्रबोधिनीच्या दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांना आमंत्रित केले होते. प्रा. डॉ. मनोहर वासवाणी यांनी कार्यशाळा समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. यात त्यांनी बुद्धिबळाचे धडेही दिले. कार्यशाळेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख डॉ. प्रभंजन माने, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी उपस्थित होते.

11 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अंध विद्यार्थ्यांनी गिरवले बुद्धिबळाचे धडे

## शिवाजी विद्यापीठाचे विशेष शिबिर; ब्रेलमधील संच भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा पॅव्हेलियनमध्ये दृष्टिदिव्यांग अर्थात अंध विद्यार्थ्यांना बुद्धिबळाच्या खेळाचे धडे देण्यात आले. विद्यापीठाकडून अंधशाळेसाठी बुद्धिबळाचे ब्रेलमधील १० संचही भेट देण्यात आले.

बुद्धिबळ हा बुद्धीचा कस पाहणारा खेळ मानला जातो. अंध व्यक्ती, विद्यार्थी यांनाही हा खेळ खेळता यावा, यासाठी ब्रेलमध्ये बुद्धिबळाचे पट उपलब्ध आहेत; मात्र अंध विद्यार्थ्यांना ते खेळावे कसे, याची माहिती नसते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि इंग्रजी अधिविभाग यांनी संयुक्तपणे अंध विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ शिकवण्यासाठी विशेष शिबिराचे आयोजन केले. यावेळी ज्ञान प्रबोधिनी अंधशाळेच्या विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. मनोहर वासवानी यांनी कार्यशाळा समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. तसेच विद्यार्थ्यांना बुद्धिबळाचे धडेही दिले.




कोल्हापूर : बुद्धिबळाचा डाव पाहताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह मान्यवर.

या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. प्रभंजन माने, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025

पुढारी

# दृष्टीदिव्यांग विद्यार्थ्यांनी गिरविले बुद्धिबळाचे धडे!

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाकडून ज्ञान प्रबोधिनी अंध शाळेसाठी बुद्धिबळाचे ब्रेलमधील १० संच भेट देण्यात आले.

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभाग व इंग्रजी अधिविभाग यांनी संयुक्तपणे अंध विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ शिकविण्यासाठी विशेष शिबिराचे नुकतेच आयोजन केले होते. कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. याप्रसंगी विद्यापीठाकडून शाळेला बुद्धिबळाचे ब्रेलमधील दहा संच भेट देण्यात आले. प्राध्यापक डॉ. मनोहर वासवानी यांनी कार्यशाळा समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. याप्रसंगी इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी
BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# अंध विद्यार्थ्यांनी विद्यापीठात गिरविले बुद्धिबळाचे धडे

**कोल्हापूर, (महा न्यूज ॲण्ड व्ह्यूज) :**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा पॅव्हेलियनमध्ये दृष्टीदिव्यांग अर्थात अंध विद्यार्थ्यांना बुद्धिबळाच्या खेळाचे धडे देण्यात आले. विद्यापीठाकडून अंध शाळेसाठी बुद्धिबळाचे ब्रेलमधील १० संचही भेट देण्यात आले.

बुद्धिबळ हा बुद्धीचा कस पाहणारा खेळ मानला जातो. अंध व्यक्ती, विद्यार्थी यांनाही हा खेळ खेळता यावा, यासाठी ब्रेलमध्ये बुद्धिबळाचे पट उपलब्ध आहेत. मात्र, अंध विद्यार्थ्यांना ते खेळावे कसे, याची माहिती नसते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि इंग्रजी अधिविभाग यांनी संयुक्तपणे अंध विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ शिकविण्यासाठी विशेष शिबिराचे नुकतेच (दि. ६) आयोजन केले. यावेळी कोल्हापुरातील ज्ञान प्रबोधिनी अंध शाळेच्या विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. मनोहर वासवानी यांनी कार्यशाळा समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. त्याचप्रमाणे





विद्यार्थ्यांना बुद्धिबळाचे धडेही त्यांनीच दिले.

या कार्यशाळेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या प्रसंगी इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाकडून शाळेला बुद्धिबळाचे ब्रेलमधील दहा संच भेट देण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025
दै. महासत्ता

# अंध विद्यार्थ्यांनी विद्यापीठात गिरविले बुद्धिबळाचे धडे



शिवाजी विद्यापीठात अंध विद्यार्थ्यांसाठी आयोजित बुद्धिबळ प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. मनोहर बासवानी, डॉ. प्रभंजन माने, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा पॅव्हेलियनमध्ये दृष्टीदिव्यांग अर्थात अंध विद्यार्थ्यांना बुद्धिबळाच्या खेळाचे धडे देण्यात आले. विद्यापीठाकडून अंध शाळेसाठी बुद्धिबळाचे ब्रेलमधील १० संचही भेट देण्यात आले. बुद्धिबळ हा बुद्धीचा कस पाहणारा खेळ मानला जातो. अंध व्यक्ती, विद्यार्थी यांनाही हा खेळ खेळता यावा, यासाठी ब्रेलमध्ये बुद्धिबळाचे पट उपलब्ध आहेत. मात्र, अंध विद्यार्थ्यांना ते खेळावे कसे, याची माहिती नसते. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि इंग्रजी अधिविभाग यांनी संयुक्तपणे अंध विद्यार्थ्यांसाठी बुद्धिबळ शिकविण्यासाठी विशेष शिबिराचे नुकतेच (दि. ६) आयोजन केले. यावेळी कोल्हापुरातील ज्ञान प्रबोधिनी अंध शाळेच्या विद्यार्थ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. इंग्रजी अधिविभागातील प्राध्यापक डॉ. मनोहर बासवानी यांनी कार्यशाळा समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळली. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना बुद्धिबळाचे धडेही त्यांनीच दिले.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या प्रसंगी इंग्रजी अधिविभाग प्रमुख डॉ. प्रभंजन माने, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यापीठाकडून शाळेला बुद्धिबळाचे ब्रेलमधील दहा संच भेट देण्यात आले.




शिवाजी विद्यापीठात आयोजित बुद्धिबळ प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये अंध विद्यार्थ्यांमधील बुद्धिबळाचा डाव पाहताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. चंद्रकांत लंगरे आदी

11 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# कृत्रिम बुद्धिमत्तेला स्वतंत्र उद्योग म्हणून अधोरेखित करणारा अर्थसंकल्प

## चंद्रशेखर टिळक : विद्यापीठात व्याख्यान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : 'कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला स्वतंत्र उद्योगाचा दर्जा देऊन अधोरेखित करणारा म्हणून यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरेल', असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थविश्लेषक चंद्रशेखर टिळक यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. अण्णासाहेब गुरव होते. टिळक म्हणाले, 'शिक्षण, आरोग्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही क्षेत्रे या अर्थसंकल्पात



चंद्रशेखर टिळक

अधोरेखित झाली आहेत. शेती, शिक्षण आणि संरक्षण यांच्याबाबतीत थेट कोणतेही भाष्य नसले, तरी अर्थसंकल्पातील विविध तरतुदी या क्षेत्रांसाठी लाभदायक आहेत. नव्या क्षेत्रात तयार होणाऱ्या नोकरी आणि उद्योगाच्या संधी या आव्हानात्मक असतील, याचा तरुणांनी संधी म्हणून उपयोग करून घ्यावा.'

डॉ. गुरव यांनी अर्थसंकल्पातून तरुणांनी सकारात्मक बदल अंगीकारावेत आणि ज्या क्षेत्रांमध्ये भविष्य आहे, त्या क्षेत्रांची वाट चोखाळावी, असे सांगितले. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. विजय ककडे, दीपा इंगवले, शशिकांत कोरे, तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते. डॉ. अर्चना मानकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025
पुढारी

# कृत्रिम बुद्धिमत्तेला स्वतंत्र उद्योग म्हणून अधोरेखित करणारा अर्थसंकल्प

## चंद्रशेखर टिळक; विद्यापीठात अर्थसंकल्पावर विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला स्वतंत्र उद्योगाचा दर्जा देऊन अधोरेखित करणारा म्हणून यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थविश्लेषक चंद्रशेखर टिळक यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अधिविभागप्रमुख डॉ. आण्णासाहेब गुरव अध्यक्षस्थानी होते.



चंद्रशेखर टिळक

टिळक म्हणाले, शिक्षण, आरोग्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही क्षेत्रे अर्थसंकल्पात अधोरेखित झाली आहेत. शेती, शिक्षण आणि संरक्षण यांच्या बाबतीत थेट कोणतेही भाष्य नसले, तरी अर्थसंकल्पातील विविध तरतुदी या क्षेत्रांसाठी लाभदायक आहेत. नव्या क्षेत्रात तयार होणाऱ्या नोकरी व उद्योगाच्या संधी आव्हानात्मक असतील, याचा तरुणांनी संधी म्हणून उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. आण्णासाहेब गुरव म्हणाले, अर्थसंकल्पातून तरुणांनी सकारात्मक बदल अंगीकारावेत आणि ज्या क्षेत्रांमध्ये भविष्य आहे, त्या क्षेत्रांची वाट चोखाळावी. डॉ. केदार मारुलकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अर्चना मानकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. विजय ककडे, डॉ. दीपा इंगवले, डॉ. शशिकांत कोरे, डॉ. तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# कृत्रिम बुद्धिमत्तेला स्वतंत्र उद्योग म्हणून अधोरेखित करणारा अर्थसंकल्प : चंद्रशेखर टिळक




**कोल्हापूर :**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला स्वतंत्र उद्योगाचा दर्जा देऊन अधोरेखित करणारा म्हणून यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थविश्लेषक चंद्रशेखर टिळक यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अधिविभागप्रमुख डॉ. आण्णासाहेब गुरव अध्यक्षस्थानी होते.

श्री. टिळक म्हणाले, शिक्षण, आरोग्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही क्षेत्रे या अर्थसंकल्पात अधोरेखित झाली आहेत. शेती, शिक्षण आणि संरक्षण यांच्या बाबतीत थेट कोणतेही भाष्य नसले, तरी अर्थसंकल्पातील विविध तरतुदी या क्षेत्रांसाठी लाभदायक आहेत. नव्या क्षेत्रात तयार होणाऱ्या नोकरी आणि उद्योगाच्या संधी या आव्हानात्मक असतील, याचा तरुणांनी संधी म्हणून उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षस्थानावरून डॉ. आण्णासाहेब गुरव यांनी अर्थसंकल्पातून तरुणांनी सकारात्मक बदल अंगीकारावेत आणि ज्या क्षेत्रांमध्ये भविष्य आहे, त्या क्षेत्रांची वाट चोखाळावी, असे सांगितले.

डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अर्चना मानकर यांनी आभार मानले. याप्रसंगी डॉ. विजय ककडे, डॉ. दीपा इंगवले, डॉ. शशिकांत कोरे, डॉ. तेजपाल मोहरेकर तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विभागातील विद्यार्थी व महाविद्यालयीन प्राध्यापक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025
लोकमत

# कृत्रिम बुद्धिमत्तेला स्वतंत्र उद्योग म्हणून अधोरेखित करणारा अर्थसंकल्प : टिळक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला स्वतंत्र उद्योगाचा दर्जा देऊन अधोरेखित करणारा म्हणून यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थविश्लेषक चंद्रशेखर टिळक यांनी सोमवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अधिविभागप्रमुख डॉ. आण्णासाहेब गुरव अध्यक्षस्थानी होते.

टिळक म्हणाले, शिक्षण, आरोग्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही क्षेत्रे या अर्थसंकल्पात अधोरेखित झाली आहेत. शेती, शिक्षण आणि संरक्षण यांच्या बाबतीत थेट कोणतेही भाष्य नसले, तरी अर्थसंकल्पातील विविध तरतुदी या क्षेत्रांसाठी लाभदायक आहेत. नव्या क्षेत्रात तयार होणाऱ्या नोकरी आणि उद्योगाच्या संधी या आव्हानात्मक असतील, याचा तरुणांनी संधी म्हणून उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. आण्णासाहेब गुरव म्हणाले, अर्थसंकल्पातून तरुणांनी सकारात्मक बदल अंगीकारावेत आणि ज्या क्षेत्रांमध्ये भविष्य आहे, त्या क्षेत्रांची वाट चोखाळावी. डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत केले. डॉ. अर्चना मानकर यांनी आभार मानले. डॉ. विजय ककडे, डॉ. दीपा इंगवले, डॉ. शशिकांत कोरे, डॉ. तेजपाल मोहरेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB 2025
तरुण भारत

# कृत्रिम बुद्धिमत्तेला स्वतंत्र उद्योगाचा दर्जा देणारा अर्थसंकल्प

प्रतिनिधी
कोल्हापूर

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राला स्वतंत्र उद्योगाचा दर्जा देऊन अधोरेखित करणारा म्हणून यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प वैशिष्ट्यपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थविश्लेषक चंद्रशेखर टिळक यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागामध्ये आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. डॉ. आण्णासाहेब गुरव अध्यक्षस्थानी होते.

टिळक म्हणाले, शिक्षण, आरोग्य आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही क्षेत्रे या अर्थसंकल्पात अधोरेखित झाली आहेत. शेती, शिक्षण आणि संरक्षण यांच्या बाबतीत थेट कोणतेही भाष्य नसले, तरी अर्थसंकल्पातील विविध तरतुदी या क्षेत्रांसाठी लाभदायक

- ज्येष्ठ अर्थविश्लेषक चंद्रशेखर टिळक यांचे प्रतिपादन

आहेत. नव्या क्षेत्रात तयार होण्र्या नोकरी आणि उद्योगाच्या संधी या आव्हानात्मक असतील, याचा तरुणांनी संधी म्हणून उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. आण्णासाहेब गुरव यांनी अर्थसंकल्पातून तरुणांनी सकारात्मक बदल अंगीकारावेत आणि ज्या क्षेत्रांमध्ये भविष्य आहे, त्या क्षेत्रांची वाट चोखाळावी, असे सांगितले. डॉ. केदार मारुलकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अर्चना मानकर यांनी आभार मानले. डॉ. विजय ककडे, डॉ. दीपा इंगवले, डॉ. शशिकांत कोरे, डॉ. तेजपाल मोहरेकर आदी उपस्थित होते.

11 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलाचा सखोल अभ्यास गरजेचा

## डॉ. हामझा वरिकोडण : शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर, ता. १० : 'हवामान बदल आणि त्याचा पावसावर होणारा परिणाम याचा सखोल अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे', असे मत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजीमधील तज्ज्ञ डॉ. हामझा वरिकोडण यांनी व्यक्त केले.

गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे अतिवृष्टीचे प्रमाण वाढले आहे. याचा फटका शेतकरी, नागरिक आणि स्थानिक प्रशासनाला बसत आहे. पूर, चक्रीवादळ, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्ती निर्माण होऊ लागल्या आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात हवामान बदलाविषयी आयोजित व्याख्यान प्रसंगी मान्यवर व्याख्यात्यांसमवेत विद्यार्थी-विद्यार्थिनी.

या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल आणि शाश्वत अभ्यास केंद्र, पर्यावरण शास्त्र विभाग, पतंगराव कदम महाविद्यालय सांगलीतर्फे डॉ. वरिकोडण यांचे 'हवामान बदल आणि अतिवृष्टी' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी आयआयटीएमचे डॉ. धियागसेन धर्मराज होते.

डॉ. वरिकोडण यांनी भारतातील मॉन्सून प्रणालीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, 'भारतीय उन्हाळी मॉन्सून जगातील सर्वांत प्रमुख मॉन्सून प्रणालींपैकी एक आहे, जी दरवर्षी जून ते सप्टेंबर दरम्यान उद्भवते आणि जगातील एक चतुर्थांशपेक्षा अधिक लोकसंख्येच्या जीवनावर परिणाम करते. जागतिक तापमान वाढ ही दुष्काळ आणि महापुरासारख्या तीव्र घटनांमागील मुख्य कारण आहे. त्यामुळे भारतीय मॉन्सूनच्या प्रादेशिक गतिशीलतेतही बदल होतो.

परिणामी, भारतातील महापूर आणि दुष्काळाच्या घटनांचे सखोल विश्लेषण करणे अत्यावश्यक आहे, कारण त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. हवामान अंदाजासाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे महत्त्वाचे आहे.'

यावेळी राणी पवार, आयआयटीएमचे प्रकल्प संशोधक अक्षय पाटील, भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. दादा नाडे, पर्यावरणशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 FEB २०२५
महासत्ता

# हवामान बदलाचा पावसावरील परिणामाचा सखोल अभ्यास आवश्यक: डॉ. हामझा वरिकोडण




शिवाजी विद्यापीठात हवामान बदलाविषयी आयोजित व्याख्यानाच्या उद्घाटन प्रसंगी आयआयटीएमचे हवामानतज्ज्ञ डॉ. धियागसेन धर्मराज. डॉ. हामझा वरिकोडण, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. आसावरी जाधव, डॉ. दादा नाडे

कोल्हापूर : हवामान बदल आणि त्याचा पावसावर होणारा परिणाम याचा सखोल अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे, असे मत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी (IITM) येथील तज्ज्ञ डॉ. हामझा वरिकोडण यांनी व्यक्त केले. गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे अतिवृष्टीचे प्रमाण वाढले आहे. याचा फटका शेतकरी, नागरिक आणि स्थानिक प्रशासनाला बसत आहे. पूर, चक्रीवादळ, दुष्काळ अशा नैसर्गिक आपत्ती निर्माण होऊ लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाचा भूगोल अधिविभाग, हवामान बदल आणि शाश्वत अभ्यास केंद्र, पर्यावरण शास्त्र विभाग, पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच डॉ. हाफजा वरिकोडण यांचे 'हवामान बदल आणि अतिवृष्टी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. आयआयटीएमचे डॉ. धियागसेन धर्मराज अध्यक्षस्थानी होते.

व्याख्यानात डॉ. वरिकोडण यांनी भारतातील मॉन्सून प्रणालीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, भारतीय उन्हाळी मॉन्सून (खडद) जगातील सर्वात प्रमुख मॉन्सून प्रणालींपैकी एक आहे, जी दरवर्षी जून ते सप्टेंबर दरम्यान उद्भवते आणि जगातील एक चतुर्थांशपेक्षा अधिक लोकसंख्येच्या जीवनावर परिणाम करते. जागतिक तापमानवाढ ही दुष्काळ आणि महापुरासारख्या तीव्र घटनांमागील मुख्य कारण आहे. त्यामुळे भारतीय मॉन्सूनच्या प्रादेशिक गतिशीलतेतही बदल होतो. परिणामी, भारतातील महापूर आणि दुष्काळाच्या घटनांचे सखोल विश्लेषण करणे अत्यावश्यक आहे, कारण त्यांचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर महत्त्वपूर्ण परिणाम होतो. डॉ. वरिकोडण यांनी विविध आधुनिक मॉडेल्सची माहिती दिली आणि हवामान अंदाजासाठी नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाला राणी पवार, आयआयटीएमचे प्रकल्प संशोधक अक्षय पाटील, शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, डॉ. दादा नाडे यांनी परिचय करून दिला. पर्यावरण शास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी आभार मानले.

11 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाराजांमुळे वतनाकडून वेतनाचे स्थित्यंतर

## डॉ. अभय टिळक; 'सकलजनवादी छत्रपती शिवराय' पुस्तक प्रकाशित

पुणे, ता. १० : ''आपल्या परंपरेचा भाग झालेले स्त्री-पुरुष समतेचे तत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या संपूर्ण जीवनात केंद्रस्थानी होते. वतनाकडून वेतनाकडे जाण्याचे मूलभूत स्थित्यंतर महाराजांनी घडवून आणले. वर्णव्यवस्थेचा प्रचंड पगडा असूनही त्यांनी कुशाग्र बुद्धीने समन्वयाचा मार्ग काढला. वर्णव्यवस्थेत दोन वर्ग निर्माण करण्याचे अचाट कर्तृत्व महाराजांचे आहे. जातिव्यवस्था खिळखिळी होण्याची सुरुवात शिवकाळातच झाली होती,'' असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. अभय टिळक यांनी केले.

डॉ. प्रकाश पवार लिखित आणि सकाळ प्रकाशनातर्फे प्रकाशित 'सकलजनवादी छत्रपती शिवराय' या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी झाले, त्या वेळी ते बोलत होते. याप्रसंगी 'सकाळ माध्यम समूहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार, ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस, लेखक डॉ. प्रकाश पवार आदी उपस्थित होते. ''स्वराज्याचे संस्थापक ही छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख किती अपुरी आहे, हे दर्शविणारे 'सकलजनवादी छत्रपती शिवराय' हे पुस्तक आहे. हे पुस्तक आपल्याला इतिहासाकडे बघण्याची प्रगल्भ, व्यापक, सम्यक, संतुलित आणि चौरस दृष्टी प्रदान करते,'' असेही गौरवोद्‌गार डॉ. टिळक यांनी काढले.

गवस म्हणाले, ''जन्म झाला तेव्हा शिवाजी राजा नव्हते. त्यांची राजा होण्याची प्रक्रिया, त्यातून व्यक्तिमत्वाला प्राप्त होणारे कंगोरे, विकसित होणारी जीवनदृष्टी आणि मग त्यातून मराठी समूहाला एकत्र आणत महाराजांनी आपल्याला व आपल्या भूमीला उन्नत केले. या प्रक्रियेतील महाराजांचा माणूस म्हणून शोध या पुस्तकात घेण्यात आला, हे त्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे.''

डॉ. प्रकाश पवार म्हणाले, ''या पुस्तकाच्या निर्मितीचे मोठे श्रेय राजन गवस यांना आहे. त्यांच्या आग्रहामुळे मी हे लेखन सुरू केले. मी इतिहासाचा अभ्यासक नाही. राज्यशास्त्र या विषयात माझे कार्यक्षेत्र आहे, मात्र इतिहास आणि इतिहासशास्त्र या दोन भिन्न गोष्टी आहेत. या पुस्तकाकडे केवळ इतिहासशास्त्र म्हणून पाहू नका. समाजशास्त्र, अर्थकारण, इतिहास, राज्यशास्त्र, मराठी साहित्य व संस्कृती या सर्वांचा मी एकत्रित मेळ घातला, त्यातून हा ग्रंथ आकारास आला.'' सकाळ प्रकाशनाच्या संपादक दीपाली चौधरी यांनी प्रास्ताविक केले. अनिरुद्ध दडके यांनी सूत्रसंचालन केले.




**शिवदर्शन :** डॉ. प्रकाश पवार लिखित आणि सकाळ प्रकाशनातर्फे प्रकाशित 'सकलजनवादी छत्रपती शिवराय' या पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) राजन गवस, डॉ. प्रकाश पवार, प्रतापराव पवार आणि डॉ. अभय टिळक.

### 'आपण इतिहासातून शिकलो नाही'

प्रतापराव पवार यांनी सांगितले की, ''आपल्यातील जातिभेद, धर्मभेद, कर्मकांड आदींचा फायदा मुस्लिम आणि इंग्रजांनी प्रचंड प्रमाणात घेतला; पण आपण इतिहासातून काहीही शिकलो नाही. भारतीय माणसांना इतिहासाबद्दल आस्था नाही, त्याचे जतन करण्याची परंपरा नाही. स्वार्थासाठी शरण जाण्याची किंवा विकले जाण्याची वृत्ती आपल्यात होती; आजही आहे. नाहीतर 'खोकी' निर्माण झालीच नसती. महाराजांचा इतिहास वाचून आपण यात सुधारणा केली पाहिजे, संपूर्ण समाजाच्या उन्नतीचा विचार केला पाहिजे.''

11 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर संपन्न

**कोल्हापूर :** पन्हाळा तालुक्यातील पाटपन्हाळा येथे शिवाजी विद्यापीठ विधी विभागातर्फे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले.

येथील चतुर्भुज मंदिरामध्ये आयोजित या शिबिराच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ विधी विभागप्रमुख डॉ. विवेक धुपदाळे होते. उपसरपंच प्रवीण तेली, प्रकाश पाटील, गणपतराव पाटील, अंतू तेली, दत्तात्रय पाटील, ॲड. प्रमोद दाभाडे, ॲड. जयदीप कदम, ॲड. संतोष शेलार, अमोल केरले यांची या कार्यशाळेत प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य, दारूबंदी, सायबर क्राईम, महिला सक्षमीकरण आणि कायदेशीर हक्क, बालकांचे हक्क, जमिनीचे हक्क आणि जमिनीवरील वाद, मोफत विधी साहाय्य याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. विधी विभागाच्या विद्यार्थ्यांनी सायबर क्राईम, घरेलू अत्याचार, दारूबंदी यावर आधारित पथनाट्य सादरीकरण केले. यावेळी ॲड. गौरी सबनीस, ॲड. सुवर्णा कांबळे, रूपाली सरगर, सागर कांबळे, अक्षय कोल्हापुरे, ॲड. प्रतीक्षा राजहंस, ॲड. शिवानी, पूजा लोहार, वैष्णवी माळी, किरण कांबळे, सूरज पोळ यांच्यासह विद्यार्थी, परिसरातील नागरिक आदी उपस्थित होते.